| MHDH070028762022 | फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ६५३/२०२२ मधील निशाणी क्र. १ वरील आदेश. (रामकृष्ण वि. ग्रामविकास अधिकारी, न्यु बोराडी) |
|---|---|

प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार नामे रामकृष्ण सगदा पावरा यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ च्या कलम १३(३) प्रमाणे त्यांची आई थावलीबाई सगदा पावरा यांची मृत्यूनोंद ग्रामपंचायत, न्यु बोराडी, ता. शिरपूर, जि. धुळे यांच्या अभिलेखामध्ये करण्यात यावी यासाठी दाखल केलेला आहे.

२. प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी की, अर्जदाराची आई थावलीबाई सगदा पावरा यांचा मृत्यू दिनांक १५.१०.१९७५ रोजी न्यु बोराडी, ता. शिरपूर, जि. धुळे येथे झाला आहे. परंतू, अर्जदाराला व त्याचे नातेवाईकांना पुरेसे ज्ञान नसल्याने ग्रामसवेकअनावधानाने अर्जदाराच्या आईची मृत्यू नोंद करावयाचे राहून गेले आहे. अर्जदारास वारस प्रमाणपत्र कामाकरिता सदर मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. ग्रामपंचायत न्यु बोराडी यांनी सदर मृत्यू नोंद नसल्याच्या आशयाचे प्रमाणपत्र अर्जदारास दिले.

३. अर्जाचे पुष्ठयर्थ निशाणी क्र. ७ वर अर्जदाराने स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले असून अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे फेरकथन केले आहे. अर्जदाराने ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत न्यु बोराडी, कार्यालयाच्या अभिलेखात मृत्यूची नोंद नसल्याबाबतचे प्रमाणपत्र निशाणी क्र. ८, अर्जदाराच्या आधारकार्डची प्रत निशाणी क्र. ३ वरील यादी सोबत व वृत्तपत्र दैनिक वार्ता मधील जाहीर प्रगटन निशाणी क्र. ९ वरील यादी सोबत दाखल केले आहेत.

४. वरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदाराच्या आईची मृत्यू नोंद संबंधित कार्यालयाच्या अभिलेखात घेण्यात आलेली नाही. जाहीर प्रगटन प्रसिध्द होवून देखील प्रस्तुत अर्जास कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. अर्जदाराच्या आईचा मृत्यू न्यु बोराडी, ता. शिरपूर, जि. धुळे येथे झाल्याचे दिसून येते. न्यायालयासमोर आलेल्या अर्जदाराच्या तोंडी व लेखी पुराव्यावरुन असे दिसते की, अर्जदाराची आई

थावलीबाई सगदा पावरा यांचा मृत्यू दिनांक १५.१०.१९७५ रोजी झाला असून अर्जदारास सदर मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदाराचा अर्ज मंजुर करणे योग्य होईल. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

आदेश

१. अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येवून ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत न्यु बोराडी, ता. शिरपूर, जि. धुळे यांना असे आदेशीत करण्यात येते की, अर्जदाराची आई थावलीबाई सगदा पावरा यांचा मृत्यू दिनांक १५.१०.१९७५ रोजी न्यु बोराडी, ता. शिरपूर, जि. धुळे येथे झाल्याबाबत नोंद अभिलेखात नियमाप्रमाणे विलंब शुल्क आकारुन घेण्यात यावी.

२. अर्जाच्या खर्चाबद्दल आदेश नाही.

Digitally signed by BHADRE RAMESH RAOAJI
Date: 2023.01.05 16:47:41 +0530

शिरपूर.
दिनांक ०५.०१.२०२३.

(आर. आर. भद्रे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (न्यायालय क्र. १)
शिरपूर, जि. धुळे.

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पीडीएफ फाईल मधील मजकूर हा मुळ आदेशाप्रमाणे शब्द न शब्द जशास तसा व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव :- गोपाल अंकुश पाटील.

कार्यालयाचे नाव :- न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (न्यायालय क्र. १) शिरपूर, जि. धुळे.

पी.डी.एफ. फाईल अपलोड केल्याचा दि. :- ०५.०१.२०२३.